पुष्पक

को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

(रजि. नं. : बी. ओ.एम./डब्लु. एस./आर.एस.आर./सी.आर./८३७४/दि.३१/१२/९८)

75 स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

रौप्य २५ महोत्सव वर्षाकडे

२४ वा वार्षिक अहवाल २०२१-२२

मुख्य कार्यालय : १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल. बी. एस. मार्ग, कांजूरमार्ग (प), मुंबई - ७८.
Email:pushpakcr@gmail.com Website : www.pushpaksociety.com Phone : 022 25780236

पुष्पक को. ऑप. क्रे. सोसा. लि.

(रजि. नं. : बी. ओ.एम./डब्लु. एस./आर. एस.आर./सी. आर./८३७४/दि.३१/१२/९८)

मा. श्री. व्हि. जी. पवार
मार्गदर्शक
(संस्थापक : ज्ञानदीप को. ऑ. क्रे. सो. लि)

श्री. गणपतराव आ. पवार
अध्यक्ष

श्री. संभाजी गे. पवार
उपाध्यक्ष

संचालक मंडळ

श्री. परशुराम शं. फडतरे
संचालक

श्री. अंकुश ज्यो. संकपाळ
संचालक

श्री. अर्जुन ज. भोसले
संचालक

श्री. व्यासदेव सु. पवार
संचालक

श्री. नारायण म. कुदळे
संचालक

श्री. श्रीकांत रा. कांबळे
संचालक

सौ. शशिकला वि. पवार
संचालिका

सौ. मिनाक्षी अ. ढमाळ
संचालिका

श्री. नारायण जि. पालवे
संचालक

डॉ. सोपानराव भि जाधव
तज्ञ संचालक
दि. २०/०४/२०२१ पर्यंत

श्री. विनायक पं. तळेकर
तज्ञ संचालक

श्री. किरण ह. पवार
व्यवस्थापक

पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

२४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २४वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दिनांक २४/९/२०२२** रोजी **सकाळी ११ वाजता** संस्थेचे अध्यक्ष **मा. श्री. जी. ए. पवार** यांच्या अध्यक्षतेखाली **आम्रपाली बँक्वेट हॉल, युनिक आर्केड बिल्डींग, डॉन बॉस्को शाळेजवळ, टागोर नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ८३** येथे खालील कामकाजासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

○ सभेपुढील विषय ○

१) दि. २६/९/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१/०३/२०२२ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील संस्थेच्या कामकाजाचा अहवाल नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक सादर करुन त्यास मंजुरी देणे.

३) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) लेखापरिक्षकांकडून आलेल्या सन २०२१-२२ सालचा अहवाल वाचुन नोंद घेणे.

५) सन २०२२-२३ सालासाठी वैधानिक हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे.

६) मागील वर्षी अंदाजपत्रकाप्रमाणे जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२२-२०२३ सालचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

७) सन २०२०-२०२१ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकाने दिलेल्या अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.

८) कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.

९) पोटनियम दुरुस्तीबाबत - निधी - ७ - अधिकृत भाग भांडवल मर्यादा वाढ करणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

आपला सहकारी,
संभाजी गे. पवार
उपाध्यक्ष
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

स्थळ : मुंबई - ४०० ०७८.
दिनांक : २५/८/२०२२

○ विशेष सुचना ○

१) गणसंख्येअभावी तहकुब झालेली सभा पोटनियमातील तरतुदीप्रमाणे त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

२) ज्या सभासदांना सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी दिनांक २२/९/२०२२ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात पाठवाव्यात. आयत्या वेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३) संस्थेच्या वार्षिक अहवालाची प्रत संस्थेची वेबसाईट www.pushpaksociety.com वर उपलब्ध आहे.

४) ज्या सभासदांनी आपला ई-मेल आयडी किंवा मोबाईल क्र. याबाबतची माहिती संस्थेत नोंद केली नसेल त्यांनी आपल्या जवळच्या संस्थेच्या शाखेत किंवा मोबाईल क्र. ७०२८०००७८७ वर सादर करावी.

चुका आणि अपयश हा प्रगतीचा भाग असतो.

अध्यक्षीय मनोगत

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

पुष्पक को-ऑप. क्रे. सो. लि., कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८ आपल्या संस्थेच्या नावामध्येच खुप गहन अर्थ लपलेला आहे. 'पुष्पक' संत तुकाराम महाराजांना वैकुंठाला नेण्यासाठी प्रत्यक्ष पांडुरंगाने पाठविलेले वाहन आणि त्या वाहनावर आरुढ झालेले संत तुकाराम. दोन्ही ही अगदी विलक्षणीय आहेत. संत तुकारामांनी लोक कल्याणाचा वसा घेतला होता ते त्यांच्या अभंगातून जनजागृती करीत होते. मुळातच तुकाराम महाराजांनी त्यांच्या घरच्या परंपरेनुसार व्यवसाय आचरला होता. परंतू त्या व्यवसायात त्यांचे मन रमले नाही, आणि त्यांनी लोकांना आपल्याकडून कशी मदत होईल याकडे लक्ष दिले आणि हे करता-करता पांडुरंगाची ध्यान धारणा करु लागले आणि एक गरुड झेप घेतली, ती म्हणजे पुष्पक विमानातून.

त्याचप्रमाणे आपली संस्था सुध्दा संताच्या कार्यातून एक चांगला बोध घेऊन त्यांची शिकवण अमलात आणून कार्य करीत आहे. लोकांच्या गरजा लक्षात घेऊन, त्यांच्या मदतीला हात पुढे करीत आहे. मग अगदी कठीण काळात सुध्दा आपली संस्था मागे राहत नाही. जिथे कोरोना सारख्या महारोगाने थैमान घातले होते. अशा ठिकाणी मृत्यू समोर उभा असताना सुध्दा, संस्था आपल्या कार्यापासून कधीच वंचित झाली नाही. अशा या आपल्या संस्थेची आज रौप्य महोत्सवाकडे वाटचाल सुरु आहे. आणि आम्हा सर्वांना खात्री आहे की यशाच्या उंचच्या उंच शिखरावर पुष्पकचे विमान पोहचेल.

संस्थेच्या सभासदांना म्हणजेच थकबाकीदारांना विनंती आहे की, आपण आपल्या कर्जाचा हप्ता वेळेवर भरावा जेणेकरुन आम्हाला कर्ज वसुलीसाठी कठोर कारवाई करावी लागणार नाही. आपण कर्जाच्या हप्त्यांची वेळेवर पुर्तता न करुन आपल्याबरोबर आपल्या जामीनदारांना सुध्दा अडचणीत आणत आहात. जामीनदारांनी सुध्दा कधीतरी संस्थेत येऊन आपण जामीन असलेले कर्जदार वेळेवर हप्ते भरतात की नाही यांची चौकशी करावी. हे जामीनदारांचे आदय कर्तव्य आहे. अशा प्रकारे सर्वच जण जर सामोपचाराने वागले तर आपली संस्था अजून बळकट व सुदृढ होईल.

संस्थेचे ठेवीदार, हितचिंतक यांनी सुध्दा वेळोवेळी येऊन संस्थेत भेटी दिल्या पाहिजेत. नवीन संकल्पना मांडल्या पाहिजेत. जर काही कमतरता असेल कार्यात तर त्यांची दुरुस्ती करुन घेतली पाहिजे. सभासदांनी केलेल्या सुचनांची खबरदारी नक्कीच घेतली जाते आणि यापुढेही घेतली जाईल याची मी व संचालक मंडळ आपणांस खात्री देतो.

आतापर्यंत आपण सर्व सभासदांनी जशी साथ आम्हांस दिली. त्याच पध्दतीने इथुन पुढे द्याल अशी अपेक्षा करतो. संचालक मंडळ, संस्थेचा कर्मचारी वर्ग व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांच्या सहकार्याने आपणांस जेवढे सहकार्य करता येईल तेवढे सहकार्य करण्याचा प्रयत्न आम्ही नक्कीच करु. आपणा सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन मी माझे मनोगत पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

'विना सहकार नाही उध्दार'

आपला विनम्र,

गणपतराव आनंदराव पवार

(अध्यक्ष)

निघून गेलेला क्षण परत कधीच आणता येत नाही.

वार्षिक कार्यवृत्तांत

सन्माननीय सभासद बंधु आणि भगिनींनो,

संस्थेचा सन २०२१-२२ चा २४वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. आपल्या संस्थेने विविध स्तरांवर साध्य केलेली प्रगती खरोखरच उत्साहवर्धक आहे. सभासदांचा संस्थेविषयीचा अतुट विश्वास, ग्राहकांशी जडलेले आपुलकीचे नाते, संचालक मंडळाचा सकारात्मक दृष्टीकोन, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधींचे अथक योगदान व संस्थेप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर संस्थेने ही प्रगती साध्य केली याबद्दल मी सर्वांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करतो.

संचालक मंडळ :

अहवाल सालात संचालक मंडळाच्या १२ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती चांगली राहिली. संचालक मंडळाच्या सभेशिवाय इतर सामाजिक कामांमध्ये संचालक सदस्यांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. अशा प्रकारच्या कळकळीच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगती सतत होत आहे. संचालक मंडळातील सर्व संचालकाच्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभासद :

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस सभासद संख्या ९५७३ होती. यामध्ये प्रत्यक्षात १९२३ नविन सभासदांची नोंद झाली आहे. अहवाल सालात १५६ सभासदांनी राजीनामा दिले आहे. त्यामुळे अहवाल सालाअखेरीस संस्थेचे एकूण सभासद ११३४० झाले आहेत. सभासदांनी ३१ मार्च २०२२ अखेर जमा असलेला भाग रक्कमेचे दाखले घेवून जावेत. एका सभासदाला रु. २ लाखांपर्यंत भाग खरेदी करता येतील. जास्तीत जास्त भाग खरेदी करुन संस्थेच्या विकासाला हातभार लावावा.

भागभांडवल :

संस्थेचे अहवाल सालच्या सुरुवातीस रु. ४,५२,०७,८००/- एवढे वसुल भागभांडवल होते. अहवाल सालात नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून जादा भाग भांडवल रु. ४१,२२,७००/- वसुल झाल्याने वाढ झाली आहे. तसेच १५६ सभासदांनी राजीनामा दिल्याने रु. ३२,७७,३००/- भागभांडवल कमी होऊन अहवाल सालाअखेर वसुल भागभांडवल रु. ४,६०,५८,७००/- एवढे झाले आहे. भागभांडवलात होणारी वाढ म्हणजेच सभासदांचा संस्थेवरील असलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे.

राखीव व अन्य निधी :

गतवर्षीच्या रु. १,१२,७०,४६८/- निधीमध्ये नफ्यातून रु. ११,७३,३९८/- व आर्थिक वर्षात प्रवेश फी नाममात्र सभासद फी रु. २८,११०/-, न घेतलेला लाभांश असे रु. ५१,६७१/- अशी रु. १२,५३,१७९/- ने वाढ होऊन अहवाल सालाअखेर राखीव निधी रु. १,२५,२३,६४७/- झालेला आहे. निधीतील वाढीचे प्रमाण ११.१२% असुन निधीची कायद्यातील तरतुदीनुसार गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेच्या निधीत होणारी वाढ संस्थेचा पाया मजबूत करणारी आहे.

ठेवी :

अहवाल सालाच्या सुरुवातीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. १,०८,७४,८४,४०१/- जमा होते. अहवाल सालात ठेवीमध्ये रु. १५,८०,६६,८४६/- वाढ झाल्यामुळे वर्षअखेरीस संस्थेच्या विविध

ठेवीमध्ये रु. १,२४,५५,५१,२४७/- जमा आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात ठेवीमध्ये १४.५४% वाढ झालेली आहे.

कर्ज :

अहवाल सालाच्या सुरुवातीस रु. १,०७,७१,२०,४१३/- कर्ज येणे बाकी होते. वाटप व वसुली देणे बाकी आहे. अहवाल सालामध्ये सभासदांना रु. ३९,६४,८९,३४७/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु. २७,४६,०५,५१९/- कर्ज वसूल झालेले आहे. वर्षाअखेरीस एकूण रु. १,१९,९०,०४,२४१/- कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात येणे कर्जात ११.३१% ने वाढ झालेली आहे.

कर्ज थकबाकी व वसुली :

संस्थेने आपली स्वतंत्र कर्ज वसुली यंत्रणा अधिक कार्यक्षम केली आहे. अनुत्पादीत कर्जे मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या संस्थेने आटोकाट प्रयत्न केले आहेत. संस्थेचा स्वतंत्र कर्ज वसुली विभाग ही अनुत्पादित कर्जे कमी करण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. त्याच प्रमाणे संस्थेचे संचालक मंडळ व वसुली समिती वेळोवेळी कर्ज वसुलीची मोहिम राबवित आहे. संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसुली समिती, वसुली अधिकारी व कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदार व त्यांच्या जामिनदारांशी संपर्क साधुन कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

नफा वाटप :

अहवाल सालात निव्वळ नफा रु. ७६,४८,४८८/- झाला असून त्यात मागील वर्षाचा नफा रु. ४,२८८/- मिळवून विभागणीसाठी रु. ७६,५२,७७६/- नफा आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

राखीव निधी	२५%	१९,१३,१९४/-
लाभांश भाग रक्कम वर प्रमाणात	८%	३५,३४,६६७/-
सभासद कल्याण निधी		२५,०००/-
इमारत निधी		५,००,०००/-
कर्मचारी कल्याण निधी		२५,०००/-
बुडीत व संशयीत कर्ज निधी		१५,००,०००/-
रौप्य महोत्सव वर्ष निधी		१,५०,०००/-
पुढील वर्षाकरीता शिल्लक		४,९१५/-
	एकूण	७६,५२,७७६/-

लाभांश :

गतवर्षीप्रमाणेच अहवाल वर्षाच्या नफ्यातून संचालक मंडळाने सभासदांना ८% लाभांश वाटपास मंजुरी दिलेली असून त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी द्यावी असे सुचविले.

खेळते भांडवल :

गतवर्षी संस्थेचे खेळते भांडवल रु. १,३८,९८,७४,९६४/- होते. त्यात रु. १५,३६,८१,४८९/- ने वाढ होवून वर्षाअखेरीस खेळते भांडवल रु. १,५४,३५,५६,४५३/- झालेले आहे. अहवाल वर्षात खेळत्या भांडवलातील वाढ ११.०६% इतकी आहे. संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये सातत्याने होणारी वाढ संस्थेची आर्थिक प्रगती दर्शविते.

लेखा परिक्षण :

संस्थेच्या दि. २६/९/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२१-२२ चे वैधानिक लेखा परिक्षण करण्यासाठी अधिकृत लेखापालांच्या सुचीमधून मे. एच. पी. भालेकर ॲन्ड असोसिएटस, सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी लेखापरिक्षणाचे काम पूर्ण करुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवाल आपल्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून संस्थेस सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

कर लेखापरिक्षण (टॅक्स) :

सन २०२१-२२ या अहवालसालाचे कर लेखापरिक्षण मा. श्री. वाय. एस. मुजुमदार आणि कंपनी सनदी लेखापाल मेंबर नं. ३३७०४ यांनी केले असून त्यांनी केलेल्या बहुमोल सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

प्रशिक्षण :

संस्थेचे मार्गदर्शक व ज्ञानदीप को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे संस्थापक-अध्यक्ष मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब सातत्याने संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचे प्रशिक्षण घेत असतात. त्यांच्या प्रशिक्षणामुळे ठरविलेली उद्दिष्टे पूर्ण झाली याचा आम्हाला आनंद आहे. तसेच मुंबई सहकारी बोर्ड व मुंबई विभागीय सहकारी पतसंस्थाचे फेडरेशन लि., मुंबई (महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई) यांच्या सहकार्याने वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. या कार्यक्रमांमध्ये उपस्थितांना मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे संस्थेच्या प्रगतीस चालना मिळाली.

कर्मचारी :

संस्थेतील अधिकारी तसेच सर्व कर्मचारी यांचेद्वारे अधिकाधिक चांगली ग्राहक सेवा देण्यासाठी, संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. यावर्षी निरनिराळ्या पध्दतीची सांघिक/व्यक्तीगत उद्दीष्टे दिल्यामुळे शाखांतर्गत अधिकारी-कर्मचारी यांचेसाठी वैयक्तिक स्तरावरही व्यवसाय वृध्दीसाठी उत्साहवर्धक वातावरणात होते. अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी जोमाने प्रयत्न करुन त्यांची व्यक्तीगत तसेच शाखांसाठीची सामुहिक उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश मिळवले. त्यांचे हे प्रयत्न अभिमानास पात्र आहेत. संस्थेच्या वाढीबरोबर सभासदांचे संस्थेबद्दलचे प्रेम वृध्दींगत करण्याचे कार्य सर्व कर्मचारी करीत आहेत. दि. ३१ मार्च २०२२ अखेरीस संस्थेच्या सेवेत अधिकारी व कर्मचारी मिळून एकूण ४५ कर्मचारी कार्यरत आहेत.

ठेव प्रतिनिधी :

संस्थेत एकूण ६८ इतके ठेव प्रतिनिधी कार्यरत असून संस्थेस ठेव संकलन करणे. कर्ज वसुलीच्या कामात सहभाग घेणे व संस्थेविषयी प्रचार, प्रसिध्दी करणे अशी महत्वाची कामे त्यांच्याकडून केली जातात. प्रत्येक शाखेत अशा अधिक ठेव प्रतिनिधींची गरज आहे. इच्छुकांनी स्वयंस्फुर्तीने अशा कामासाठी संस्थेत कार्यरत असावे अशी संचालक मंडळाची अपेक्षा आहे.

सभासद अपघात विमा :

मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या संकल्पनेतून संस्थेने आपल्या सर्व सभासदांसाठी व कर्जदारांसाठी न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विमा संरक्षण उपलब्ध करुन दिले आहे. प्रत्येक सभासदांना विनामूल्य रु.१ लाख विमा संरक्षण दिले जाते. या योजनेअंतर्गत यावर्षी २ सभासदांच्या वारसांना विमा रक्कम मिळालेली आहे.

अचूकता पाहिजे असेल तर सराव महत्त्वाचा आहे.

श्रध्दांजली :

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात तसेच कोविड १९ या जागतिक महामारीने मृत पावलेल्या व्यक्तींना संस्थेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हि ईश्वरचरणी प्रार्थना.

आभार :

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील अनेक सहकारी पतसंस्था, नागरी बँका व इतर स्वयंसेवी संस्थांशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. या सर्व संबंधित संस्थांचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी व सभासद या सर्वांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांनी संस्थेच्या उद्दीष्टे पूर्तीसाठी घेतलेल्या अथक परिश्रमाबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे. संस्थेचे सर्व सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांनी व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल व दिलेल्या सहकार्याबद्दल संचालक मंडळाच्या वतीने मी सर्वाचे मनपुर्वक आभार मानतो. एका अभिमानास्पद वळणावरुन संस्थेच्या प्रगतीचा प्रवास सुरु आहे. नव्या जबाबदाऱ्या, नवीन आकांक्षा, नवीन अपेक्षा, नव्या स्वप्नांच्या क्षितीजाकडे झेपावत असताना आपणा सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा ठेवून हा अहवाल पूर्ण करीत आहे.

आपला विनम्र,

गणपतराव आनंदराव पवार

(अध्यक्ष)

परिशिष्ट - अ

संस्थेचे नांव	: पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
कार्यालय पत्ता	: १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८.
नोंदणी दिनांक	: ३१/१२/१९९८
नोंदणी क्रमांक	: BOM/WS/RSR/CR/८३७४/१९९८
कार्यक्षेत्र	: बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा, नगर जिल्ह्यापुरते.
सभासद संख्या	: ११३४०
अधिकृत भाग भांडवल	: ५,००,००,०००/-
वसुल भाग भांडवल	: ४,६०,५८,७००/-
राखीव व इतर निधी	: ४,८८,००,८२४/-
ठेवी	: १,२४,५५,५१,२४७/-
गुंतवणूका	: २४,२७,७९,९०५/-
कर्जे	: १,१९,९०,०४,२४१/-
सी. डी. रेशो	: ७६.४३%
बाहेरील कर्जे	: ५,४९,४७,७०४/-
अहवाल वर्षात निव्वळ नफा	: ७६,४८,४८८/-
ऑडीट वर्ग	: अ
खेळते भांडवल	: १,५४,३५,५६,४५३/-
शाखा	: १४
कर्मचारी संख्या	: ४५
ठेव प्रतिनिधी	: ६८
संमिश्र व्यवसाय	: २५८ कोटी

अंदाजपत्रक २०२२-२३

	अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज		अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज
भांडवल व देणी	सन २१/२२	सन २१/२२	सन २२/२३	मालमत्ता व येणी	सन २१/२२	सन २१/२२	सन २२/२३
वसुल भाग भांडवल	५२८९३१२६	४६०५८७००	५५२७०४४०	रोख व बँक शिल्लक	५१३६०९४	१२९२९१०	१४८६८४७
राखीव व इतर निधी	५१११०६४०	४८८००८२४	५६१२०९४८	गुंतवणुक	२६१३८१६९६	२४२७७९९०५	३०३४७४८८१
सभासद ठेवी	११६३६०८३०९	१२४५५५१२४७	१४३२३८३९३४	सभासद कर्ज	११३०९८५३५९	११९९००४२४१	१३५४८७४७९२
ठेवीवरील व्याज तरतुद	१४०५९४७३१	१३५९६७६१९	१५५००३०८६	कायम व इतर मालमत्ता	६१४७६५३	५४४०७६२	६११७२९३
इतर देणी व तरतुदी	७३२९४७०३	५५९३६७८४	५८७३३६२३	सुरक्षा अनामत/कार्या.	४२५९६९७३	४३२२८२२१	४७११८७६१
लाभांश देणे बाकी	२७३७१०३	३५८८५०३	४०१९१२३	ठेवीवरील येणे व्याज	४०९७३७२१	४८७६२९६९	५४१२६८९६
एकूण नफा	५५७१८२५	७६५२७७६	८८३७६५९	इतर येणी	२५८८९४१	३०४७४४५	३१६९३४३
एकूण	१४८९८१०४३७	१५४३५५६४५३	१७७०३६८८१३	एकूण	१४८९८१०४३७	१५४३५५६४५३	१७७०३६८८१३

	अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज		अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज
खर्च तपशील	सन २१/२२	सन २१/२२	सन २२/२३	जमा तपशील	सन २१/२२	सन २१/२२	सन २२/२३
ठेवीवरील व्याज	१०९३४६९०८	११३१५८५१५	१३०१३२२९२	कर्जावरील व्याज	१२३७४३१३७	१३३०८६०१८	१५३०४८९२१
बँक कर्ज व्याज	४९२०५३६	४०२४०३०	४६२७६३५	इतर उत्पन्न	२१८८५८८	२६३७५१०	३०३३१३७
पगार व इतर भत्ते	१५५९३४६४	१४५९१०१९	१६७७९६७२	बँक लाभांश	०	४६००६	४८३०६
प्रशासकीय खर्च	९१६५३९०	९७९०१६५	११२५८६९०	गुंतवणुकीवरील व्याज	१९७८९६४८	१४३७२६४८	१६५२८५४५
तरतुदी व इतर खर्च	११२३२५०	९२९९६५	१०२२९६२				
नफा	५५७१८२५	७६५४८४८८	८८३७६५९				
एकूण	१४५७२१३७३	१५०१४२१८२	१७२६५८९०९	एकूण	१४५७२१३७३	१५०१४२१८२	१७२६५८९०९

Balance Sheet for the year ended 31st March 2022

31/03/21	Liabilities	Amount	31/03/22
1,50,00,000.00	**Authorised Share Capital अधिकृत भाग भांडवल**		5,00,00,000.00
4,52,07,800.00	Paid up Share Capital वसुल भाग भांडवल	4,52,07,800.00	
	Add - Rec. During the year अधिक अहवालसाली जमा	41,22,700.00	
	Less - Refund During the year अहवालसाली परत	32,77,300.00	4,60,58,700.00
	Reserve & Other Funds राखीव व इतर निधी		
1,12,70,468.00	Reserve Fund राखीव निधी	1,24,95,537.00	
0.00	Enterance Fee प्रवेश फी	19,230.00	
0.00	B Class Member नाममात्र सभासद	8,880.00	1,25,23,647.00
1,23,75,561.00	Reserve for Bad & Doubtful debts बुडीत कर्ज निधी	1,26,48,079.00	
1,87,62,301.00	Building Fund इमारत निधी	1,96,18,381.00	
4,27,491.00	Member Welfare Fund सभासद कल्याण निधी	4,37,491.00	
8,41,620.00	Staff Welfare Fund कर्मचारी कल्याण निधी	8,41,620.00	
1,12,526.00	Charitable Fund धर्मदाय निधी	81,606.00	
26,50,000.00	Standard Assets Prov. उत्पादीत कर्ज तरतूद	26,50,000.00	
8,84,700.00	Loan Security Deposit कर्ज सुरक्षा ठेव	0.00	3,62,77,177.00
	Deposits ठेवी		
6,20,79,763.00	Daily Deposits दैंनदिन ठेव	7,27,87,091.00	
4,34,79,494.00	Saving Deposits बचत ठेव	4,46,45,281.00	
1,00,07,452.00	Recurring Deposits आवर्त ठेव	1,19,92,351.00	
23,62,37,942.00	Fixed Deposits मुदत ठेव	28,89,64,240.00	
4,15,20,920.00	Double / Bonus Deposits दामदुप्पट / बोनस ठेव	4,45,89,585.00	
2,37,850.00	Agent Security Deposits प्रतिनिधी सुरक्षा ठेव	2,60,670.00	
20,76,00,761.00	Monthly Interest Deposits मासिक व्याज ठेव	25,87,70,665.00	
39,20,70,832.00	Shubarambh Deposits शुभारंभ ठेव	43,51,53,407.00	
6,91,71,633.00	Short Term Deposits अल्प मुदत ठेव	6,85,72,081.00	
11,22,682.00	Pushpanand Deposits पुष्पानंद ठेव	16,55,119.00	
1,58,200.00	Loan Security Deposits कर्ज सुरक्षा ठेव	1,53,700.00	
72,56,850.00	Lakpati Deposits लखपती ठेव	93,12,390.00	
96,74,250.00	Suvarna/Vidhyut Pushpa Deposits सुवर्ण/विद्युत पुष्प ठेव	39,15,750.00	
33,46,412.00	Pushpasamruddhi Deposits पुष्प समृध्दी ठेव	24,55,456.00	
22,45,000.00	Viman Pushpa Deposits विमान पुष्प ठेव	8,20,000.00	
12,74,360.00	Staff Security Deposits स्टाफ सिक्युरिटी ठेव	15,03,461.00	1,24,55,51,247.00
6,87,26,235.00	**Borrowings बँक ओडी खाते**		5,49,47,704.00
	Other Liabilities इतर देणी व तरतुदी		
11,834.00	Surcharge Account सरचार्ज खाते	14,084.00	
9,950.00	Proffessional Tax (PT) व्यवसाय कर	8,975.00	
46,600.00	Insurance & Development Fund विकास निधी	49,139.00	
53,416.00	Tax Deducted at Source टी.डी.एस. खाते	79,713.00	
7,05,000.00	Audit Fee Payable ऑडीट फी देय	7,27,000.00	
1,34,100.00	Professional Fee Payable प्रोफेशनल फी देय	0.00	
1,17,343.00	Employees P.F. Contribution कर्मचारी पी.एफ.	1,10,169.00	9,89,080.00
27,23,486.00	Unclaimed Dividend न घेतलेला लाभांश		35,88,503.00
13,26,36,539.00	**Interest Payable ठेवीवरील देणे व्याज**		13,59,67,619.00
	P & L Appropration A/c नफा तोटा खाते	4,288.00	
46,93,593.00	Add : Current year profit अधिक चालू वर्षाचा नफा	76,48,488.00	76,52,776.00
1,38,98,74,964.00	**Total**		**1,54,35,56,453.00**

M/s. H. P. Bhalekar & Ass. (Chartered Accountant)

शिक्षणावर केलेली गुंतवणूक उत्तम व्याज मिळवून देते.

Balance Sheet for the year ended 31st March 2022

31/03/21	Assets	Amount	31/03/22
	Cash & Bank Balance रोख व बँक शिल्लक		
5,39,815.00	Cash in Hand रोख शिल्लक	14,673.00	
44,46,684.00	Cash at Bank बँक शिल्लक	12,78,237.00	12,92,910.00
	Investments गुंतवणूक		
4,72,50,304.00	F. D. at M.D.C. Bank मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक	7,91,28,641.00	
8,10,98,696.00	F. D. at Jaoli/Satara Bank मुदत ठेव जावली/सातारा बँक	7,31,64,374.00	
3,34,39,041.00	F. D. at Sopan Bank मुदत ठेव सोपान बँक	2,21,45,152.00	
1,03,81,180.00	F. D. at Saraswat Bank मुदत ठेव सारस्वत बँक	1,00,14,433.00	
3,38,85,488.00	F. D. with Society मुदत ठेव सोसायटी	4,53,05,798.00	
1,08,13,871.00	F. D. at M.D.C.C. Bank (R/F) मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक	1,20,72,007.00	
9,21,000.00	Share with M.D.C. Bank भाग मुंबै बँक	9,21,000.00	
10,000.00	Share with K.S.S.K. Ltd. भाग साखर कारखाना	10,000.00	
3,000.00	Share with M.R.S.P. Fed. भाग महा. पतसंस्था फेडेरेशन	1,000.00	
5,500.00	Share with P.U.Z.P. Fed. भाग पूर्व उपनगरे फेडेरेशन	7,500.00	
10,000.00	Share with D.G.C. Ltd. भाग डी.जी.सी. लि.	10,000.00	24,27,79,905.00
	Security Deposits सुरक्षा अनामत		
15,320.00	Telephone Deposits टेलिफोन अनामत	13,320.00	
17,725.00	Electricity Deposits विज अनामत	17,725.00	
2,00,39,953.00	Office Building कार्यालय इमारत	2,10,39,953.00	
2,09,92,100.00	Building Security Depo. इमारत अनामत	2,09,92,100.00	
5,000.00	Security Depo. at BEST बी.ई.एस.टी. अनामत	5,000.00	
4,35,000.00	Office Deposits कार्यालय अनामत	4,90,000.00	
6,70,123.00	Security Depo. at Msed महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रीक बोर्ड	6,70,123.00	4,32,28,221.00
	Fixed Assets कायम स्वरुपी मालमत्ता		
88,040.00	Air Condition ए.सी.	66,030.00	
43,80,717.00	Furniture & Fixture फर्निचर व फिक्चर	39,67,027.00	
12,66,837.00	Computer Equipments संगणक	12,91,093.00	
1,19,314.00	Daily Collection Machine दै. कलेक्शन मशीन	1,16,612.00	54,40,762.00
	Loan कर्ज		
1,90,00,090.00	Personal Loan वैयक्तिक कर्ज	2,16,23,845.00	
2,27,54,414.00	Daily Personal Loan दै. ठेव वैयक्तिक कर्ज	2,40,43,750.00	
0.00	Group Personal Loan गट वैयक्तिक कर्ज	2,96,90,987.00	
8,85,66,342.00	Vehicle Loan वाहन कर्ज	8,85,40,504.00	
65,67,91,725.00	Business Loan व्यवसाय कर्ज	73,37,41,650.00	
11,87,44,166.00	Against Depo. Loan ठेव तारण कर्ज	12,70,21,887.00	
5,21,33,731.00	Security Personal Loan सुरक्षित वैयक्तिक कर्ज	5,47,03,486.00	
9,00,50,256.00	Arbitration Loan लवादी कर्ज	9,13,10,804.00	
30,52,320.00	Staff Personal Loan कर्मचारी वैयक्तिक कर्ज	27,53,283.00	
1,67,25,576.00	Staff Housing Loan कर्मचारी गृहतारण कर्ज	1,76,91,900.00	
93,01,793.00	Gold Loan सोने तारण	78,82,145.00	1,19,90,04,241.00
3,93,97,809.00	**Int. Receivable** व्याज येणे		4,87,62,969.00
	Other Assets इतर मालमत्ता		
14,565.00	Adheshive Stamps अधेसिव्ह स्टॅम्प	23,670.00	
10,73,065.00	T.D.S. Receivable	15,80,071.00	
14,25,904.00	Sainath Credit Society	14,25,904.00	
8,500.00	Festival Advance	17,800.00	30,47,445.00
1,38,98,74,964.00	**Total**		**1,54,35,56,453.00**

S. G. Pawar (Vice-Chairman) **G. A. Pawar** (Chairman)

परिस्थिती गरीब असली तरी चालेल पण विचार भिकारी नसावेत.

Profit & Loss Account for the year ended 31st March 2022

31/03/21	Expenditure	Amount	31/03/22
10,03,18,264.00	Interest on Deposits ठेवीवरील व्याज		11,31,58,515.00
48,96,056.00	Interest on Bank Loan बँक कर्जावरील व्याज		40,24,030.00
1,06,93,339.00	Salary पगार	1,16,18,831.00	
15,75,241.00	Stipend विद्यावेतन	8,95,406.00	
6,35,889.00	Bonus & Emp. Gratuity बोनस व कर्मचारी ग्रॅज्युटी	5,99,072.00	
14,01,461.00	Employee P. F. Exp. कर्मचारी पी. एफ. खर्च	14,77,710.00	1,45,91,019.00
75,055.00	Postage & Telegram पोस्टेज व टेलिग्राम	1,05,306.00	
5,54,198.00	Rents कार्यालय भाडे	4,06,938.00	
97,765.00	Travelling Exp. प्रवास खर्च	1,39,506.00	
2,37,025.00	Eletricity Exp. वीज खर्च	2,90,717.00	
6,05,887.00	Insurance Exp.	6,48,200.00	
89,877.00	Repair & Maintance दुरुस्ती खर्च	3,04,543.00	
3,15,442.00	Annual Maintanance Exp. वार्षिक देखभाल खर्च	4,14,819.00	
75,410.00	GST Exp. जी.एस.टी. खर्च	4,644.00	
1,50,985.00	Misc. Exp. किरकोळ खर्च	1,25,619.00	
12,773.00	News Paper वर्तमान पत्र	12,135.00	
2,76,862.00	Printing & Stationary छपाई स्टेशनरी खर्च	1,60,926.00	
29,925.00	Pooja Exp. पूजा खर्च	57,617.00	
3,28,219.00	Telephone Exp. टेलिफोन खर्च	3,37,487.00	
31,89,378.00	Commission Exp. कमिशन खर्च	36,71,129.00	
0.00	Legal Fees कायदेशीर शुल्क	9,660.00	
35,512.00	Loan Recovery Charges कर्ज वसुली खर्च	41,862.00	
39,601.00	Bank Charges बँक चार्जेस	2,11,829.00	
8,21,048.00	Audit Exp. लेखापरिक्षण फी	8,49,106.00	
31,100.00	Advertisement जाहिरात	10,660.00	
40,320.00	Professional Charges व्यवसाय खर्च	1,22,492.00	
2,39,664.00	Entertainment Exp. चहापान खर्च	2,98,391.00	
0.00	A. G. M. Exp. वार्षिक सभा खर्च	22,342.00	
7,03,110.00	Recovery Charges वसुली खर्च	12,83,208.00	
0.00	Licence Fee परवाना शुल्क	27,100.00	
90,589.00	Cleaning Exp. साफसफाई खर्च	1,21,664.00	
17,013.00	Water Exp. पाणी बिल	47,409.00	
46,280.00	Training Exp. प्रशिक्षण खर्च	7,480.00	
0.00	Meeting Exp. सभा खर्च	50,760.00	
7,927.00	T. D. S. Exp. (Mseb) टॅक्स	6,616.00	97,90,165.00
11,01,225.00	**Deprication घसारा**		9,29,965.00
46,90,082.00	Profit & Loss A/c. नफा तोटा खाते		76,48,488.00
13,34,22,522.00	**Total**		**15,01,42,182.00**

M/s. H. P. Bhalekar & Ass. (Chartered Accountant)

जीवनात आपला सर्वात सुंदर सोबती आपला आत्मविश्वास आहे.

Profit & Loss Account for the year ended 31st March 2022

31/03/21	Income	Amount	31/03/22
1,86,69,479.00	Interest on Bank Depo. ठेवीवरील व्याज	1,43,72,648.00	
11,30,07,431.00	Interest on Loan कर्जावरील व्याज	13,30,86,018.00	14,74,58,666.00
7,75,345.00	Misc. Income किरकोळ जमा	12,98,539.00	
1,01,602.00	M.s.e.d. Commission एम.एस.ई.डी. कमिशन	1,67,701.00	
8,68,665.00	Processing Charges सर्व्हिस चार्ज	11,71,270.00	
0.00	Dividend on M.D.C. Bank लाभांश मुंबै बँक	46,006.00	26,83,516.00
13,34,22,522.00	Total		15,01,42,182.00

S. G. Pawar (Vice-Chairman) **G. A. Pawar** (Chairman)

व्यवस्था हिच घराची शोभा असते.

नमुना 'एन-२'

(कलम ८१ आणि नियम ६९ (३) नुसार)

प्रति,
अध्यक्ष
पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग,
कांजुरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैद्यानिक लेखापरिक्षण अभिप्राय :

१. पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई या संस्थेचे दि. १/४/२०२१ ते ३१/३/२०२२ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केलेले असून, त्यामध्ये दि. १/४/२०२१ ते ३१/३/२०२२ या दिनांकाचा ताळेबंद व त्या दिनांकास संपणारे नफा-तोटा पत्रक आणि त्यात समाविष्ट केलेल्या हिशोबांच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेले नियमान्वये आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चुक यामुळे होणाऱ्या लक्षनीय चुकांपासून मुक्त राहतील, अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

लेखापरिक्षकांची जबाबदारी :

३. आर्थिक पत्रके बनविणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागू असलेले मान दंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरुन केलेली आहे. ह्या मापदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची अकानी व अमंलबजावणी अशा प्रकारे करावी की ज्या येणे हिशोबात लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण अशी खात्री पटेल.

४. लेखापरिक्षणामध्ये उघड न झालेले दोष आणि रक्कम यातील पुरावा जमा करण्याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनीयोजनेच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षणामध्ये जमा खर्चाच्या मुल्यांकनाच्या विनीयोजनेचा वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्रकांचे सादरीकरण याचा समावेश आहे.

५. आमच्या लेखापरिक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

अभिप्राय :

६. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेली टिपणी व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६०, नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थासाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.
   १. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/३/२०२२ ची स्थिती आणि
   २. नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब आणि क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय :

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तयार करण्यात आलेली आहेत.

मी अहवाल करतो की :

८. अ. लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीनुसार व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते पुरेसे आहेत.
   ब. आमच्या तपासणीतून जीतपत दृष्टीपत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.
   क. संस्थेच्या शाखांचे हिशोबाची तपासणी करुन आलेले शाखा लेखापरिक्षकांचे अहवाल हे आमचा लेखापरिक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.
   ड. संस्थेस चालू तपासणी कालावधी सन २०२१-२२ या वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आलेला आहे.

सही,
मे. एच. पी. भालेकर ॲन्ड असोसिएटस
सनदी लेखापाल
सहकारी संस्था, पॅनल क्र. १०९४५

पुष्पक को. ऑप. क्रे. सोसा. लि.

(रजि. नं. : बी. ओ.एम./डब्लु. एस./आर. एस.आर./सी. आर./८३७४/दि.३१/१२/९८)

शनि जयंती निमित्त संस्थेच्या वतीने प. पु. नंदगिरी महाराज शनि देवस्थान, सोळशी यांच्या समवेत संस्थेचे संचालक व कर्मचारी

मार्गदर्शक मा. व्हि. जी. पवार साहेब यांचा सन्मान करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. जी. ए. पवार, माजी अध्यक्ष श्री. परशुराम फडतरे, संचालक श्री अर्जुन भोसले व इतर उपस्थित मान्यवर

प्रशिक्षण कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित संस्थेचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्ग

प्रगती पथावर पुष्पक

सन	मार्च २०१७	मार्च २०१८	मार्च २०१९	मार्च २०२०	मार्च २०२१	मार्च २०२२
सभासद	२९९३	४०३६	६३७२	८३७३	९५७३	११३४०
वसुल भाग भांडवल	१७२१४१००	१९३७२७००	३१९७११००	४२४४५६००	४५२०७८००	४६०५८७००
राखीव व इतर निधी	३०९१५९०७	३५०२३१२२	३९८९२३१०	४४४३९००७	४७३२४६६७	४८८००८२४
एकूण ठेव	६७२७४०६६३	७६७२२२३१४	९२०००५७५७	१०३७६१०५७७	१०८७४८४४०१	१२४५५५१२४७
कर्ज येणे	६५९७८२५६३	७४७८३०६६९	९०५२९३१३३	१०२४७५६८७२	१०७७१२८९१३	११९९००४२४१
गुंतवणूक	१२९७६१०४८	१५३१७१७१९	१९६५५६१६२	२०५७१२४८३	२१७८१८०८०	२४२७७९९०५
निव्वळ नफा	४३०५५८८	४८७१११६	५९१२४८५	५९९४९४८	४६९००८२	७६४८४८८
लाभांश	१३%	१३%	१३%	१०%	८%	८%
खेळते भांडवल	८४७६९६९५४	९६२३१५०४१	११६७१८३४७४	१३२०२८३०२७	१३८९८७४९६४	१५४३५५६४५३
ऑडीट वर्ग	अ	अ	अ	अ	अ	अ
कर्मचारी व प्रतिनिधी	९९	१०९	१११	१२०	११९	११३

बुक-पोस्ट

सभासद क्र.

श्री./श्रीमती

पुष्पक को. ऑप. क्रे. सोसा. लि.

(रजि. नं. : बी. ओ.एम./डब्लु. एस./आर. एस.आर./सी. आर./८३७४/दि.३१/१२/९८)

मुख्य कार्यालय : १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल. बी. एस. मार्ग, कांजूरमार्ग (प), मुंबई - ७८, फोन : २५७८०२३६